2018 VI 22 | 0230 | Seat No. :

Time : 1½ Hours

**SOCIAL SCIENCE – I (M)**
**(History and Political Science)**

**Subject Code**

| S | 0 | 1 | 2 | A |
|---|---|---|---|---|

**Total No. of Questions : 4** **(Printed Pages : 4)** **Maximum Marks : 40**

*सूचना :* i) ***प्रत्येक*** *मुख्य प्रश्नाचे उत्तर* ***नवीन*** *पानावर सुरू करा.*
ii) *प्रश्न आणि उपप्रश्न यांचे क्रमांक* ***स्पष्टपणे*** *लिहा.*
iii) ***सर्व*** *प्रश्न सोडविणे* ***आवश्यक*** *आहे.*
iv) ***उजव्या*** *बाजूला दिलेले अंक प्रश्नांचे* ***गुण*** *दर्शवितात.*

1. अ) प्रत्येक विधानासाठी (अ, ब, क) असे तीन पर्याय दिलेले आहेत. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य तो पर्याय निवडा आणि त्याचे सूचकाक्षर क्रमांकासमोर लिहा. **[2]**

i) ऑलिव्हर ट्विस्ट ही कादंबरी __________ याने लिहिली.
अ) एच्. जी. वेल्स
ब) जोनाथन स्विफ्ट
क) चार्ल्स डिकिन्स

ii) छपाईच्या कलेचा शोध प्रथम ___________ इथे लागला.
अ) जर्मनी ब) चीन क) भारत

iii) सन् 1767 मध्ये काच, कागद आणि रंग यावर कर भरण्याचा कायदा करण्यात आला, त्याचे नाव _______
अ) चहाचा कायदा
ब) स्टॅम्प ॲक्ट कायदा
क) टाउनशेंड कायदा

iv) काँग्रेसची दुसरी वसाहती परिषद __________ या वर्षात बोलावली गेली.
अ) 1774 ब) 1775 क) 1781

ब) पुढील प्रश्नांची उत्तरे **प्रत्येकी एका** वाक्यात लिहा : **[2]**

i) ''गोऱ्या माणसाचे ओझे'' कशाला म्हटले आहे ?

ii) राजा राम मोहन रॉय यांनी प्रकाशित केलेल्या नियतकालिकाचे नाव काय ?

क) पुढीलपैकी **एका** प्रश्नाचे उत्तर **दोन** वाक्यांत लिहा : **[2]**

i) अमेरिकेच्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा याला उत्कृष्ट दस्तऐवज असे का म्हणतात ?

ii) ब्रिटिश पार्लमेंटने बोस्टन टी पार्टी नंतर वसाहतवाद्यांना कशाप्रकारे शिक्षा केली ?

ड) पुढीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नाचे उत्तर **चार** वाक्यांत लिहा : **[4]**

i) औद्योगिक क्रांतीमुळे बालकामगाराना कशा प्रकारे त्रास सहन करावा लागला ?

ii) औद्योगिकीकरणाचे चांगले परिणाम सांगा.

2. अ) 'अ' गटामध्ये दिलेल्या विशिष्ट व्यक्तीशी 'ब' गटामध्ये दिलेल्या योग्य विधानासोबत जोड्या लावा आणि त्याचे सूचकाक्षर क्रमांकासमोर लिहा. **[2]**

| **'अ' गट** | **'ब' गट** |
|---|---|
| i) व्हिक्टर इमॅन्युएल दुसरा | अ) गुन्हेगार युद्ध |
| ii) काउंट काव्हूर | ब) इटलीचा राजा |
| iii) सुभाषचंद्र बोस | क) अभिनव भारत |
| iv) विनायक दामोदर सावरकर | ड) स्वराज्य पार्टी |
| | इ) फोरवर्ड ब्लॉक |

ब) पुढील प्रश्नांची उत्तरे **प्रत्येकी एका** वाक्यात लिहा : **[2]**

i) पहिल्या जागतिक महायुद्धानंतर तुर्की लोकांवर कोणता अपमानकारक तह लादण्यात आला ?

ii) इटलीच्या एकत्रीकरणासाठी स्थापन करण्यात आलेल्या गोपनीय समितीचे नाव काय ?

क) पुढील प्रश्नांची **प्रत्येकी दोन** कारणे द्या : **[6]**

i) सोळाव्या लुईची न्यायपद्धती असमानतेवर आधारलेली होती.

ii) व्हिएन्ना तहामुळे जर्मन उदारमतवादी नाराज झाले.

iii) महात्मा गांधींनी असहकार चळवळ सुरू केली.

3. अ) 'ब' गटातील शब्दांचा 'अ' गटातील शब्दांशी परस्पर संबंध आहे. तशाच प्रकारे 'क' गटाशी संबंधित शब्द 'ड' गटात लिहा. **[2]**

| अ.क्र. | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| i) | टी. बी. कुन्हा | गोवा कृति समिती | पुरुषोत्तम काकोडकर | __________ |
| ii) | काबो वर्दे | दिवाकर काकोडकर | अंगोला | __________ |
| iii) | सुरेंद्रनाथ बॅनर्जी | मवाळ नेता | बिपिन चंद्र पाल | __________ |
| iv) | प्लासीची लढाई | 1757 | बक्सारची लढाई | __________ |

ब) पुढील प्रश्नांची उत्तरे **प्रत्येकी एका** वाक्यात लिहा : **[4]**

i) गोवा विमोचन समितीचे मुख्यालय कोठे स्थापन करण्यात आले ?

ii) केंद्रीय विधीमंडळाचे कायमचे सभागृह कोणते ?

iii) निवडणूक विद्यालयात कशाचा समावेश होतो ?

iv) भारताच्या राष्ट्रपतींना कोणत्या कारणास्तव पदच्युत केले जाऊ शकते ?

क) पुढीलपैकी प्रश्नाचे उत्तरे **प्रत्येकी दोन** वाक्यात लिहा : **[4]**

i) पोर्तुगीजांविरुद्धचे सुरवातीचे बंड अयशस्वी का झाले ?

ii) लोकसभेचे सभापतीपद हे महत्त्वाचे पद आहे, स्पष्ट करा.

4. अ) प्रत्येक प्रश्नासाठी (अ, ब, क) असे तीन पर्याय दिलेले आहेत. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य तो पर्याय निवडा आणि त्याचे सूचकाक्षर विधानाच्या क्रमांकासमोर लिहा. **[2]**

i) नगर परिषदेचे मुख्य कोण ?

अ) महापौर    ब) मुख्य अधिकारी    क) अध्यक्ष

ii) ग्राम स्तरावर निवडून आलेल्या समितीला काय म्हणतात ?

अ) पंचायत

ब) जिल्हा पंचायत

क) पंचायत समिती

iii) उत्तर गोवा जिल्ह्यात किती विभाग आहेत ?

अ) 5 ब) 6 क) 11

iv) शहरी स्थानिक संस्थांची निवडणूक कोण घेते ?

अ) राज्य वित्त आयोग

ब) जिल्हा नियोजन समिती

क) राज्य निवडणूक आयोग

ब) पुढील प्रश्नांची उत्तरे **प्रत्येकी एका** वाक्यात लिहा : **[2]**

i) ग्रामसभेची विशेष सभा केव्हा आयोजित करण्यात येते ?

ii) अलीकडील काळात शहरी स्थानिक संस्थांचे मूळ उद्देश कोणते ?

क) पुढील **एका** प्रश्नांची **प्रत्येकी दोन** कारणे द्या : **[2]**

i) स्वतंत्र आणि नि:पक्षपाती न्याय व्यवस्था असणे अत्यंत आवश्यक आहे.

ii) सर्वोच्च न्यायालयास अभिलेख न्यायालय असे म्हटले जाते.

ड) पुढील प्रश्नांची उत्तरे **प्रत्येकी दोन** वाक्यात लिहा : **[4]**

i) विधानसभेचे सभासद होण्यासाठी आवश्यक पात्रता कोणती ?

ii) राज्यपालांचे आर्थिक अधिकार स्पष्ट करा.